
दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
वर्ष : ०४, अंक : १९३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, रविवार, दि.२३ फेब्रुवारी २०२५




## थोडक्यात

### गांजा तस्करी करणाऱ्या महिलेसह तिघांना बेड्या

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, पिंपरी- चिंचवड :** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने गांजा तस्करी करणाऱ्या महिलेसह एकूण तीन जणांना अटक केली आहे. आरोपींकडून ९६ किलो गांजा दोन चार चाकी वाहनासह ६३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई चाकण पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली. संजय पांडुरंग मोहिते, मनसाराम नूरजी धानका यांच्यासह महिलेला अटक करण्यात आली आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम गायकवाड हे पोलीस अंमलदार निखिल वर्पे यांच्यासह गस्त घालत होते. दोन चार चाकी वाहनांमधून गांजाची तस्करी केली जात आहे. अशी गुप्त माहिती बातमीदार मार्फत मिळाली. पुणे- नाशिक महामार्गावरील रोहकल फाटा या ठिकाणी नाकाबंदी करून दोन्ही वाहन ताब्यात घेण्यात आली. दोन्ही वाहनातील एकूण तीन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. त्यांच्याकडे विचारपूस करण्यात आली. यात एका महिलेचा देखील समावेश होता. अंमली पदार्थ विरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या समक्ष वाहन तपासल्यानंतर दोन्ही वाहनात एकूण सहा पोत्यांमध्ये ९६ किलो २०४ ग्रॅम गांजा आढळून आला. संजय पांडुरंग मोहिते, मनसाराम नूरजी धानका यांच्यासह महिलेला अटक करण्यात आली आहे. या पैकी संजय मोहिते याच्यावर कामशेत आणि लोणी काळभोर पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस अंतर्गत गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

### मालमोटार रिक्षावर उलटून तीन जण ठार

**दि.२२, मालेगाव :** येथून जवळच असलेल्या दरेगाव शिवारात शनिवारी सकाळी साडे अकरा वाजेच्या सुमारास मालमोटार ऑटो रिक्षावर उलटून झालेल्या अपघातात तीन जण जागीच ठार झाले असून २ जण जखमी झाले आहेत. जखमींना येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. राष्ट्रीय महामार्गावरील दरेगाव जवळील पर्यायी वळण रस्त्याने मालेगावकडून चाळीसगाव चौफुलीकडे प्रवाशी घेऊन ॲटो रिक्षा जात होती. त्याचवेळी कापडाच्या गाठी भरलेली विरोधी दिशेने येणारी मालमोटार या रिक्षावर अचानक पलटली. यात रिक्षा मालमोटारीखाली दाबली गेली. रिक्षामधील प्रवाशी त्यात अडकले. अपघात घडल्याचे समजताच स्थानिकांनी मदतकार्य सुरू केले. नागरिकांनी मालमोटारीत अडकलेला चालक व सहाय्यकाला आधी बाहेर काढले. दरम्यान, पोलीस घटनास्थळी दाखल झाले. क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त मालमोटार हटविल्यानंतर रिक्षामधील तीन जणांचा जागीच मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. अब्दुल कलाम अब्दुल मनान ४७, अल्कमा मुख्तार खान (२५), व सना कौसर मोहंमद युसुफ (२४) अशी या अपघातातील मृतांची नावे असून ते मालेगावचे रहिवाशी आहेत. अब्दुल हा रिक्षा चालक आहे. या अपघातात मालमोटार चालक व त्याचा सहाय्यक असे दोघे जखमी झाले असून त्यांना येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी पवारवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे.

## मराठी बोलण्यास दिला नकार ! महाराष्ट्र-कर्नाटक बस सेवा बंद...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, बेळगाव :** कर्नाटक राज्य परिवहन मंडळाच्या बसच्या कंडक्टरला बेळगावमध्ये मराठी बोलण्याच्या कारणावरून शुक्रवारी मारहाण करण्यात आली आहे. दोन विद्यार्थी मराठी बोलत होते, त्यांनी कंटक्टरला कन्नडऐवजी मराठी बोलण्यास सांगितले. त्यानंतर बाचाबाची झाल्यामुळे त्याचे पर्यवसन हाणामारीत झाले. महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमा परिसरात भाषिका वाद नवा नाही. आता ताज्या प्रकरणानंतर आंतरराज्यीय बस सेवा तात्पुरती खंडीत करण्यात आली आहे. बेळगावहून महाराष्ट्राला जाणाऱ्या बस आता सीमेजवळ असलेल्या कोगनोली चेकपॉईंटपर्यंत धावत आहेत. तर महाराष्ट्रातून कर्नाटकला जाणाऱ्या बसेस कागल तालुक्यापर्यंत सेवा देत आहेत.




शनिवारी महाराष्ट्रातील बस चालकाला कर्नाटकातील चित्रदुर्ग येथे कन्नड बोलण्यावरून मारहाण करण्यात आली. तसेच बसला आणि चालकाच्या तोंडाला काळे फासण्यात आले. त्यानंतर हा वाद उफाळला होता. या घटनेला प्रत्युत्तर म्हणून शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कोल्हापूर मध्यवर्ती बस स्थानकात उभ्या असलेल्या कर्नाटकच्या बसेसना काळे फासले आणि भगवे झेंडे बांधले.

शुक्रवारी घडलेल्या घटनेत तीन पुरुषांना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच त्यांच्याबरोबर असलेल्या अल्पवयीन मुलीलाही ताब्यात घेतले. केएसआरटीसी बसचा वाहक मराठीत बोलत नसल्यामुळे त्यांच्यात वाद झाला होता. त्यानंतर अल्पवयीन मुलीने वाहकाविरोधात विनयभंगाची तक्रार दाखल केली. त्यामुळे वाहकावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

बेळगाव तालुक्यात शुक्रवारी दुपारी ही घटना घडली होती. केएसआरटीसीचे कंडक्टर महादेव हुक्केरी (५१) यांनी बसमधून प्रवास करणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना मराठीऐवजी कन्नडमध्ये बोलण्यास सांगितले. मला मराठी समजत नाही, असे उत्तर वाहकाने दिल्यानंतर प्रवासी आणि कंटक्टरमध्ये वाद निमाण झाला. या घटनेनंतर कर्नाटकमध्ये शुक्रवारी तणावाने वातावरण निर्माण झाले. या घटनेची माहिती पसरताच कर्नाटक नव निर्माण सेनेचे कार्यकर्ते शनिवारी बस स्थानकावर गेले आणि त्यांनी महाराष्ट्रातून आलेल्या बसेसची तोडफोड करत बसेसवर असलेल्या मराठी मजकूराला काळे फासले.

महादेव हुक्केरी यांनी एएनआय वृत्तसंस्थेशी संवाद साधला. ते म्हणाले, मी बसमध्ये तिकीट फाडत होतो. बसमध्ये अधिकतर महिला प्रवाशी होत्या. कर्नाटकमध्ये महिलांना बस प्रवास मोफत आहे. एक मराठी जोडपेही प्रवास करत होते. त्या महिलेने दोन मोफत तिकीट देण्यास सांगितले. पण मी एकच तिकिट देणार असल्याचे सांगितल्यानंतर त्यांनी मराठी बोलण्यावरून वाद घातला. मला मराठी समजत नाही, असे सांगितल्यानंतर बसमधील सात ते आठ प्रवाशांनी मला मारहाण केली.

हुक्केरी यांच्यावर बेळगावमधील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी चार जणांना ताब्यात घेतल्यानंतर आज न्यायालयाने तीन जणांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. तर अल्पवयीन मुलीला सुधारगृहात पाठवले.

## प्रेयसीच्या लग्नात तलवार घेऊन प्रियकर आला अन...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, नागपूर :** गेल्या दोन वर्षांपासून तरुण आणि तरुणीचे एकमेकांवर प्रेम. दोघांनी प्रेमाच्या आणाभाका घेऊन प्रेमविवाह करण्याचा निर्णय घेतला. मात्र, प्रियकर गुन्हेगारी प्रवृत्तीचा असल्यामुळे कुटुंबीयांनी प्रेमविवाहास नकार दिला. तरुणीचे अन्य युवकाबरोबर लग्न ठरवले. प्रियकराला माहिती मिळताच प्रेयसीच्या लग्नात तलवार घेऊन पोहचला. त्याने तलवार दाखवून नवरदेवाला आणि त्याच्या नातेवाईकाला धमकी देणे सुरु केले. गोंधळ घालत असतानाच वधूच्या भावाचा मित्र मध्यस्थी करायला आला. त्या मित्राचा प्रियकराने लग्नमंडपातच भोसकून खून केला. ही थरारक घटना गृहमंत्र्यांचे शहर अशी ओळख असलेल्या नागपुरात घडली. विहंग (२३, टेकानाका) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कपीलनगरात राहणारी २२ वर्षीय युवती रिया (बदललेले नाव) उच्चशिक्षित असून तिचे आरोपी युवक बिरजू याच्यासोबत गेल्या दोन वर्षांपासून प्रेमसंबंध होते. दोघांच्या प्रेमसंबंधाची कुणकुण कुटुंबियांना लागली. तसेच बिरजूवर काही गुन्हे दाखल आहेत आणि तो गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे, अशी माहिती कुटुंबियांना मिळाली. त्यामुळे कुटुंबियांनी रियाला तंबी दिली आणि लग्नास विरोध दर्शविला. तिने बिरजूला लग्नास नकार देऊन कुटुंबियांमुळे अडचण येत असल्याचे सांगितले. मात्र, बिरजूला रियासोबतच लग्न करायचे होते. त्यामुळे तो रियाला पळून जाऊन प्रेमविवाह करण्यास तयार करीत होता. मात्र, तिने कुटुंबियांच्या विरोधात जाऊन लग्न करणार नाही, असे बजावले होते. त्यामुळे बिरजू चिडून होता. त्याने रियाच्या वडिलांची भेट घेऊन रियासोबत लग्न करण्याची बोलणी केली. मात्र, तिच्या वडिलांनी त्याला स्पष्ट नकार देऊन त्याला हाकलून दिले. त्यामुळे बिरजू संतापला होता.

**प्रेयसीचे लग्न मोडण्याचा कट !**

बिरजूच्या त्रासामुळे रियाच्या वडिलांनी घाईघाईत रियाचे लग्न ठरवले. ही माहिती मिळताच बिरजूने प्रेयसीच्या लग्न मोडण्याचा कट रचला. रियाच्या हळदीच्या कार्यक्रमाच्या दिवशी बिरजू तिच्या घरी पोहचला. त्याने रियाच्या कुटुंबीयांशी वाद घालून लग्न मोडण्याची धमकी दिली. या प्रकरणी कपीलनगर पोलिसांना माहिती देण्यात आली. मात्र, कपीलनगर पोलिसांनी प्रकरण गांभीर्याने घेतले नाही. त्यामुळे हे हत्याकांड घडले.

**लग्नातच केला खून...**

छत्रपती शिवाजी महाराज मंगल कार्यालयात शुक्रवारी लग्न लागत होते. दरम्यान बिरजू हा साथिदारांसह तलवार घेऊन लग्न मंडपात घुसला. त्याने नवरदेवांकडील मंडळींना धमकी दिली. दरम्यान, वधूच्या भावाचा मित्र विहंग याने बिरजूशी चर्चा केली. त्याला लग्न मंडपातून बाहेर जाण्यास सांगितले. बिरजूने विहंगच्या पोटात तलवार भोसकून खून केला. या हत्याकांडामुळे मंगल कार्यालयात एकच खळबळ उडाली. मात्र, पोलिसांच्या हलगर्जीपणामुळे हे हत्याकांड घडल्याची माहिती समोर आली.

## घरफोडीच्या वाढत्या घटनेला पोलिसांनी त्वरित आळा घालावा - सुमेध चव्हाण

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२२, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील खापरखेडा पोलीस स्टेशन अंतर्गत चिचोली (खापरखेडा), भानेगाव येथील ग्रामस्थांच्या वतीने चिचोली (खापरखेडा) सर्कल रिपाईच्या एका शिष्टमंडळाने परिसरात दिवसेंदिवस वाढत्या चोरीच्या घटनेला आळा घालून चोरांना तात्काळ अटक करण्याची मागणी नागपूर ग्रामीणचे पोलीस अधिक्षक यांना खापरखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांच्या मार्फत निवेदन देऊन केली आहे.



भानेगावं, खापरखेडा परिसरातील गावात चोरीच्या घटनात बरीच वाढ झाली असून कायदा सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. घराला कुलूप लावून बाहेरगावी जाणे कठीण झाले आहे. कुलुपबंद घरावर अज्ञात चोरट्यांची नजर राहात मध्यरात्री नंतर घरफोडीच्या घटना घडण्याचे प्रकार सुरुच आहेत. चोरी, घरफोडीच्या घटना घडून एक महिना होत आहे, तरीही आरोपी आता पर्यंत पोलिसांना सापडेना.

एकाच महिन्यात खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीत ८-९ चोरी घरफोडीच्या घटना घडल्या आहेत. मात्र, आरोपीचा आता पर्यंत शोध नाही त्यामुळे कायदा सुव्यवस्थेचे काय ? असे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

गावातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे त्यासाठी लवकरात लवकर चोरांच्या मुसक्या आवळून होणाऱ्या घटनेवर निर्बंध लावून चोरी, घरफोडीच्या आरोपीवर कठोर कार्यवाही करत, आरोपीला तात्काळ अटक करून त्याच्या राहत्या घरासह पूर्ण गावभर धिंड काढावी, अशी मागणी चिचोली (खापरखेडा) सर्कल रिपाईचे महासचिव सुमेध चव्हाण यांनी सर्व ग्रामस्थांच्या वतीने पोलीस प्रशासनाला दिलेल्या पत्रकाच्या माध्यमातून केली आहे.

यावेळी चिचोली (खापरखेडा) ग्रामपंचायतचे सदस्य धीरज देशभ्रतार, प्रशांत पाटील, निखिल भीमगडे रमेश लांजेवार, प्रितम सोमकुवर सुभाष मेश्राम, सिद्धांत चव्हाण, विजय ढोके विशाल वाघमारे संकेत वाहने निरंजन खोब्रागडे अंशुल वासनिक, नाईद शेख, वृषभ ढोके, प्रिन्स डोंगरे, अयान्त सुरपाम शुभम पाटील, नयन पाटील, रवी लोखंडे, सीमा हुमणे अरुणा नारनवरे, मायाबाई बागडे, शारदा लांजेवार, अश्विनी चव्हाण, कुंदा पाटील, शिल्पा धनवटे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने प्रामुख्याने उपस्थित होते.

## नेपाळमधून सोयाबीन तेलाची बेसुमार आयात

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, मुंबई :** नेपाळमध्ये तेलबियांचे फारसे उत्पादन होत नाही. नेपाळला खाद्यतेलाची आयात करावी लागते. पण, भारत – नेपाळ मुक्त व्यापार करारामुळे नेपाळमधील उद्योजक कच्च्या खाद्यतेलाची आयात करून शुद्ध खाद्यतेलाची मोठ्या प्रमाणावर भारताला निर्यात करतात. याचा भारतीय खाद्यतेल उद्योगाला मोठा फटका बसत आहे. त्यामुळे केंद्र सरकारने मुक्त व्यापार कराराचा फेरविचार करावा, अशी मागणी खाद्यतेल उद्योगातून होत आहे.

नेपाळला एका वर्षाला ४ लाख ३० हजार टन खाद्यतेलाची गरज असते, म्हणजे महिन्याला ३५ हजार टन. सप्टेंबर २०२४ मध्ये केंद्र सरकारने तेलबियांना चांगला दर मिळावा म्हणून खाद्यतेलावर आयात शुल्क लागू केला. पण, नेपाळ – भारत दरम्यान मुक्त व्यापार करार आहे. त्यामुळे नेपाळमधून आयात होणाऱ्या कोणत्याही वस्तूवर कर लावला जात नाही. खाद्यतेल आयातीवरही कोणताही कर लावला जात नाही. याच बाबीचा फायदा नेपाळमधील खाद्यतेल निर्यातदारांनी घेतला आहे.

१५ ऑक्टोबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५, या तीन महिन्यांत नेपाळने १ लाख ९४ हजार ९७४ टन खाद्यतेलाची आयात झाली आहे, तर याच काळात नेपाळने भारताला १ लाख ७ हजार ४२५ टन खाद्यतेल निर्यात केले आहे. म्हणजे दर महिन्याला नेपाळमधून ५० ते ६० हजार टन खाद्यतेलाची आयात होते. म्हणजे नेपाळमधील खाद्यतेल शुद्धिकरण प्रकल्प नेपाळमध्ये मोठ्या प्रमाणावर खाद्यतेल आयात करतात आणि भारताला शुल्कमुक्त खाद्यतेल निर्यात करतात. प्रामुख्याने नेपाळच्या सीमेवरील राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर खाद्यतेलाचा पुरवठा केला जातो. त्यामुळे देशातील खाद्यतेल उद्योगाचे नुकसान होते. शिवाय कर चुकवेगिरीमुळे केंद्र सरकारचे कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे भारत- नेपाळ मुक्त कराराचा फेरआढावा घ्यावा, अशी मागणी खाद्यतेल उद्योगातून होत आहे.

**जाणीवपूर्वक करचुकवेगिरी ?**

देशाला दरवर्षी १५० लाख टन खाद्यतेल आयात करावे लागते. सप्टेबर २०२४ मध्ये केंद्र सरकारने कच्च्या खाद्यतेलावर ३५.७५ टक्के आयात शुल्क लागू केला होती. नेपाळमधून होणाऱ्या आयातीवर कर नसल्यामुळे यंदा चार लाख टन खाद्यतेल होण्याची शक्यता आहे. हे चार लाख टन खाद्यतेल कोणत्याही शुल्का शिवाय होईल. एक व्यापाऱ्यांने दिलेल्या माहितीनुसार काही भारतीय व्यापारी आयात शुल्क बुडविण्यासाठी नेपाळमधील शुद्धिकरण प्रकल्पांना हाताशी धरून कर चुकवेगिरी करून जास्त नफा मिळविण्यासाठी ही तेल आयात करीत आहेत. त्यामुळे देशी उद्योगांना संरक्षण देण्यासाठी आणि आयात शुल्काच्या अभावी होणारे नुकसान टाळण्यासाठी मुक्त व्यापार कराराचा फेरआढावा घेण्याची गरज आहे, असे मत सॉल्वेंट एक्सट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे (एसईए) कार्यकारी अध्यक्ष भारत मेहता यांनी व्यक्त केले.

# संपादकीय



## कर्मयोगी...

महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज जयंती. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वछ करीत. सार्वजनिक स्वछता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी, परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या प्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवऋषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची १४९ वि जयंती, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

# कर्मयोगी संत गाडगे बाबा


**सुंदरते ध्यान कीर्तनी शोभले । करी धरियेले गाडगे काठी ।।**
**डोई शुभ्र केस उडती वाऱ्याने । चिंध्या प्रकाशाने चमकती ।।**
**कीर्तनाचे रंगी डुल्लतो प्रेमाने । भजनानंद म्हणे डेबुजीचा ।।**

असे रसाळ वर्णन त्यांचे केले जाते त्या श्री संत गाडगेबाबांची आज जयंती आहे. त्यांचे एकूण जीवन तेजस्वी आणि ओजस्वी होते.ते म्हणायचे,' धर्म सांगायचं नसतो, जगायचं असतो. धर्मग्रंथात नसतो जीवनात असतो. मी तुम्हाला सर्व धर्माचे सार सांगतो- भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड्या नागड्यांना वस्त्र, बेघरांना आसरा, बेकरांना रोजगार,अंध अपंगांना औषध, मुक्या प्राण्यांना अभय द्या. कर्ज काढू नका. कष्टशिवाय भाकर खाऊ नका. निरंतर उद्योग करा. हाच खरा धर्म. '

संत गाडगेबाबांनी सांगितलेल्या खऱ्या धर्माची व्याख्या जनसामान्यात रुजली पाहिजे. ' जगातील सर्वांचे दुःख हेच माझे दुःख!' हे सत्य उमगलेल्या सत्यशोधकाच्या मालिकेत संत गाडगेबाबा आपल्याला पाहायला मिळतात. ' व्यसन व वैभिचारापासून जनतेला दूर करणे, साक्षरता,साक्षेप, अखंड उद्योग, सहकार आणि काटकसरीने वागण्यास लोकांना तयार करणे. सावकाराच्या दारापाशी आयुष्यात कधी जायचे नाही. देव भोळेपणा आणि अनिष्ट रूढी रिवाजापासून जनतेला सावध करणे. ' हे त्यांच्या आयुष्याचे सार होते.

' मला कुणी शिष्य नाही, मी कुणाचा गुरु नाही!' हा त्यांच्या स्वाभिमानी बाणा आजच्या पिढीने आत्मसात केला पाहिजे. चिकित्सा न करता कोणत्याही भोंदू बाबाचा भक्त होऊन त्याच्या मागे फिरण्यापेक्षा ; लाथ घालेन तेथून पाणी काढेन! हा आत्मविश्वास आज प्रत्येकाने कमवला पाहिजे. गाडगेबाबा आपल्या कीर्तनात नेहमी,' उपाशी रहा पण कर्ज काढून सावकाराच्या जाळ्यात अडकू नका', असा सल्ला द्यायचे. त्यांच्या आजोबाची जमीन सावकारी कर्जासाठी गहान पडली. सावकाराने हिशोब न दाखवता जमिनीवर कब्जा करण्याचा प्रयत्न केला.डेबुजीनी त्याला प्रखर विरोध केला. तरीदेखील शेवटी त्यांचे आजोबा हंबीररावणी १५ एकर शेत जमीन सावकाराच्या घशात ओतली. तो तंटा मिटवला. यातून गाडगे बाबांनी फार मोठा धडा घेतला. सावकारी पाश किती करकसून शेतकऱ्याच्या मानेभोवती आवळला जातो याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी घेतला होता.

गाडगे बाबांच्या पत्नी कुंताबाई यांना मुलगी झाल्यावर बारशाच्या दिवशी पाहुण्या-रावळ्यांनी दारू मटणाची मागणी केली. त्याकाळी कर्ज काढून,भीक मागून हे देवकार्य करावे लागायचं.बोकडाची कंदुरी आणि दारू जात-गोतवाल्यांना दिल्याशिवाय जमत नव्हतं. या विरुद्ध गाडगेबाबानी दंड थोपटले.मटन दारू ऐवजी बुंदीचे लाडू,पोळ्या असा बेत केला.जात कुळीला बट्टा लावला! म्हणून गोतावळ्यातील मंडळी ओरडू लागली. त्यांनी लोकांना समजावून सांगितले,' मटन दारूची रुडी धर्माची नाही. आपल्या अडाणीपणाची नि जिभेच्या चोसल्याची आहे.जीव जन्माला आला,की दुसऱ्या एका जीवाची हत्या आणि कोणी मेला तरी हत्या हा काय धर्म समजता का?' अशा प्रकारच्या उपदेशातून लोकांच्या मन, मेंदूवर प्रभाव टाकण्याची कला डेबुजींनी स्वतः उचललेल्या क्रांतिकारक पावलातून निर्माण केली. लोकांच्या आचार विचारांना



धक्का देण्याचे तंत्र डेबुजीने सफाईदारपणे आयुष्यभर वापरले. ज्याप्रमाणे भगवान बुद्धाने दुःखाचा शोध घेण्यासाठी आणि निर्वाणीचा मार्ग जगाला दाखवण्यासाठी आपल्या राजवैभवाचा त्याग केला,त्याप्रमाणे संत गाडगेबाबांनी आजोबाची शेतीवाडी, घरात धन धान्य,दुध दुभत्यांचा सुकाळ, प्रतिष्ठा, आज्ञाधारक पत्नी, दोन गोजिरवाण्या मुली, आई, आजी-आजोबा या साऱ्यांचा त्याग करून घर संसार सोडले. स्वतः मधील काम, क्रोध, लोभ मोह, मद,मत्सर या षड्रिपूचा त्याग केला. पाय नेतील तिकडे जायचे, मिळेल तसली भाकरी खायची, अडचणीत सापडल्यांना मदत करायची आणि पुढे मोकाट्याने चालत जायचे, हा नित्यक्रम त्यांनी आरंभला. एखाद्या शेतात खळं चालू असेल तर तेथे विना मोबदला राबराब राबायचे. थंडी, वारा, पाऊस कडाक्याचे ऊन,तुफान, वावटळ, रानातल्या वनव्यांची आग या साऱ्यांना तोंड देत, जंगलातील साप, विंचू, वाघ, लांडगे यांना न घाबरतात सतत अनेक वर्ष ते चालत राहिले. ज्या गावात ते जात तेथे हातातील झाडूने साफसफाई करत. सायंकाळी त्याच गावातील लोकांच्या डोक्यात झालेला कचरा आपल्या शेलक्या शब्दातून दूर लोटत. अडाणी नाक्षर म्हणून स्वाभिमानाला मुकलेल्या श्रमजीवी कष्टाळू सामान्य जनांना संसार सावरण्याची अक्कल शिकवत.त्यांची कीर्ती प्रांतोप्रांती पसरली. 'चापरेबुवा , वट्टी साधू, लोटके महाराज, चिंधेबुवा, गाडगे महाराज अशा विविध नावाने ते ठीक ठिकाणी ओळखले जाऊ लागले. आपल्या कीर्तनातून त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, निरक्षरता,देव भोळेपणा जादूटोणा, चमत्कार,हिंसा यावर प्रहार केला. तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी घाट बांधले, धर्मशाळा उभा केल्या. शाळा आणि बोर्डिंग सुरू करणाऱ्यांस मदत केली. हे सर्व करत असताना लोकांनी त्यांना देणग्या दिल्या. त्यामधून त्यांनी स्वतःसाठी एखादा मठ किंवा साधी झोपडी सुद्धा उभारला नाही. ते सतत जनकल्याणासाठी भटकत राहिले. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, प्रबोधनकार ठाकरे या सर्वांवर गाडगे बाबांचा प्रभाव होता. महाराष्ट्रातील संत परंपरेबाबत 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस' असे म्हणले जाते. संत गाडगेबाबांच्या कार्यामुळे - 'या कळसावर गाडगेबाबांनी २० व्या शतकात कर्मयोगाचा ध्वजा चढवला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**अशा या कर्मयोगी संताचे विचार आणि कृती बहुजन समाजातील लोकांचे मन,मेंदू,मनगट मजबूत करणारे होते.**

**- किशोर जाधव,**
**स्तंभ लेखक,ब्लॉग राईटर,**
**शिक्षक, व्याख्याता,सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

## महा पर्वणी...

साहित्य सम्मेलन
खास महा पर्वणी
बहु साहित्यप्रकार
अव्याहत झरवणी

कटूऔषधांसोबत
अमृताची पुरवणी
साहित्यिक रसिक
ग्रंथ संगम त्रिवेणी

पाहून साहित्यिका
झरार वाहे लेखणी
रसिकासमोरसादर
कला कृती देखणी

संयोजकांनीपरिक्षा
समृध्द हो आखणी
पुस्तकांची शिबीरे
रत्नाचीबावन्नखणी

अहोरात्रप्रयास राबे
काही राहू नये उणी
गालबोट लागे चुकी
हृदयसलेल टोचणी

उद्रेकरोध अनाठाई
आधी घेती चाचणी
मुक्त मोहक सोहळा
ना सत्ताधारीदावणी

आकर्षक बहु विध
कार्यक्रमाचीबांधणी
दिग्गजा सहीत हवी
नवोदितांची नोंदणी

संपन्नहोता महोत्सव
जागेसुरेखआठवणी
हे सुबक सह मिलन
मनामनात साठवणी

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# पटलं तर घ्या....!

सध्या लगिनघाई चालू झाली आहे.तरुण मुलं विवाहासाठी मुली बघताहेत. साखरपुडा, विवाहाच्या तारखा निश्चित होत आहे त्यादृष्टीने खरेदीचे नियोजन चालू आहे. मंगल कार्य, कॅटरिंग,मंडप,बँड,डीजेची बुकिंग सुरु झाली आहे. काळ बदलत चालला आहे. त्यादृष्टीने या सर्व घडामोडी मध्ये काही अंशी बदल केल्यास आदर्श समाज निर्माण होईल. संस्कृती रितीरीवीजाप्रमाणे सर्व काही करा मात्र, व्यर्थ गोष्टी टाळा. सध्या मोबाईल इंटरनेटचे युग आहे तर, लग्नपत्रिका न छापता लग्नाचे आमंत्रण व्हाट्सअँप च्या माध्यमातून किंवा कॉल वरून जवळच्या नातेवाईकांना द्या. लोक उन्हातान्हात मोटरसायकल, बस किंवा अन्य वाहनाने जातात.अति उष्णतेने उष्मघाता सारख्या घटतात.त्याचबरोबर वेळ, पैसा वाया जातो. तर वेळ व पैसाही वाचेल अति घाई गडबडमुळे अनर्थ टळतील.दुसरं असं की,विवाहप्रसंगी पूर्वीपासून आहेराची प्रथा चालू आहे. भांडे, वस्तू कपडे लत्ते यामुळे, यावर भरमसाठ पैसे खर्च होतो व त्यामध्ये केवळ व्यवहार होतो. आज आपण घेतला कि,समोरच्याला परत करावा लागतो.त्या वस्तू कित्येक वर्ष वरपक्षांकडे तसाच पडून राहतात.अगोदरच घरामध्ये सर्व उपयोगी वस्तू उपलब्ध असतात. लग्न करून फक्त एकटी मुलगीच सासरी जाते, कदाचित तिच्या गरजा भागतील एवढे साहित्य तर राहू शकते म्हणून, वस्तूरूपी आहेर न घेता मुलीच्या वडिलांना नगदी पैशाच्या स्वरूपातआहेर केल्यास वधूपित्याला आर्थिक मदत होईल. मोजक्याच लोकांना बोलावून,येणाऱ्या नातेवाईकांचा आदरतिथ्य व विचारपूस करा कारण ते मौल्यवान वेळ काढून कार्यासाठी आलेले असतात. व्याही-विहीन यांच्या व्यतिरिक्त इतर कुणाचाही सत्कार समारंभ करू नका.शक्य झाल्यास केवळ शब्दसुमनांनी आभार माना. मेंहदी व हळदीसाठी संगीत व डीजेवर खर्च करू नका. विकृती म्हणून प्री-वेडिंग,अफ्टर वेडिंग फोटो काढून विवाहप्रसंगी मोठ्या पडल्यावर प्रदर्शन करू नका.नात्यातील पवित्र्यजपा. या विकृतीमुळे कित्येक विवाह हे विवाह संपन्न होण्या अगोदर मोडल्या जात आहे. म्हणून प्री-वेडिंग व अफ्टर वेडिंग फोटोग्राफी टाळा. नेमकेच फोटो काढा. नंतर त्याला कोणी बघत नाही. महागड्या कपड्यावरील खर्च टाळा. कारण नंतर कोणी घालत नाही. धुळ खात पडून राहतात.एका दिवसाच्या लग्नासाठी शेती विकून, कर्ज काढून, आयुष्यभरासाठी कर्जबाजारी होऊ नका.

विवाहासाठी जास्त पैसा खर्च करण्यापेक्षा, पैसे जास्त असतील तर मुला मुलींच्या नावावर मुदत ठेव करा. त्यांना भविष्यात अडचणीच्या काळात मदत होईल आणि होईलच....!कारण संसाराचा व्याप वाढतो, मुलांचे शिक्षण त्यांच्या गरजा भागवण्यास नक्कीच मदत होईल. मुला-मुलींचे लग्न योग्य वयातच लावा. त्याचबरोबर लग्न सुद्धा वेळेवरच लावा. मुहूर्त टळू देऊ नका. वधूकडील मंडळीचे केलेले नियोजन बिघडते. त्यातून काही मनासारखं न झाल्यास वाद होण्याची दाट शक्यता राहते. म्हणून वेळेत व आटोपशीर लग्न विधी उरकवा. जेणेकरून धार्मिक विधी व्यवस्थित पार पडतील, त्यातून शास्त्रानुसार विवाहाचे महत्त्व कायम राहील.

विवाह प्रसंगातील अत्यंत महत्त्वाचा विषय म्हणजे जेवणाच्या पंगती...!वधू पित्यांनी घ्यावयाची दक्षता म्हणजे,जेवणासाठी जे पदार्थ बनवणार ते अगदी मोजके त्यात एक किंवा दोन भाजी, पोळी,भात किंवा एखादा गोड पदार्थ बनवा.व्यतिरिक्त जास्त पदार्थ जेवणात ठेवू नका. सध्या बफे पद्धतीची फॅशन सुरू आहे. त्याचबरोबर पदार्थातील विविधता टाळा.काही ठिकाणी पाणीपुरी, साउथ इंडियन, नाश्ता,आईस्क्रीम वगैरे पदार्थांची विविधता असल्यामुळे लोक सर्व पदार्थ चाखण्याचा प्रयत्न करतात व त्यामुळे पूर्ण न खाता अर्धवट खाऊन टाकून देतात. त्यामुळे अन्नाची नासाडी होते. त्याचप्रमाणे उपस्थित वऱ्हाडी मंडळींनी सुद्धा द्यावयाची दक्षता कि,आपण सार्वजनिक ठिकाणी जेवायला आलोय.कुणाच्या आयुष्यभराच्या कमाईतून घाम गाळून,मेहनत करून कमावलेल्या पैशातून हे कार्य पार पडत आहे तर आवश्यक तेवढेच ताटात घ्या. व्यर्थ वाया घालवू नका. अन्न जरी दुसऱ्याचे असले तरी पोट आपले असते याचे भान ठेवा. आपण जर स्वतःच्या पैशाने एखादी आईस्क्रीम दुकानातून विकत घेतली तर ती चाटून- पुसून खातो म्हणून, वधू-पित्यांचा त्याच्या मेहनतीचा व अन्नाचा एकदा तरी विचार करा.

विवाह प्रसंगी हळदी कार्यक्रमापासून तर नवरदेव विवाह मंडपात जाण्या अगोदरच्या मिरवणुकीमध्ये डान्स करण्याचीपद्धत रूढ झाली आहे.कर्ण कर्कश आवाजातील डीजे लावल्या जात आहे. त्या आवाजाने कित्येक लहान मुले वृद्ध व्यक्तींना हृदय विकाराचे झटके येत आहेत. त्याचबरोबर भयंकर प्रमाणात होतध्वनी प्रदूषण होत आहे. खर्चही अफाट होत आहे, म्हणून पारंपारिक पद्धतीचे वाद्य वाजवून विवाह साजरा केल्यास अतिउत्तम...! लग्नाच्या तिथी साधारण उन्हाळ्यामध्ये असतात. काही भागांमध्ये तर भयंकर तापमान असते. अशा परिस्थितीतही काही तरुण मंडळी मध्य प्राशन करून डान्स करतात. एका- एका लग्नामध्ये पन्नास -पन्नास हजार रुपये दारूवर खर्च करतात. त्यातून केवळ वादविवाद होतात व शुभ प्रसंगाला गालबोट लागतो म्हणून,मद्यप्राशनावर पूर्णतः बंदी आणायला हवी. लग्नकार्य प्रसंगी अक्षदा म्हणून तांदूळ किंवा काही ठिकाणी ज्वारी वापरतात.त्याऐवजी जर फुलांच्या पाकळ्या वापरल्या तर छान होईल, कारण साधारण आठ ते दहाहजार लोकसंख्येच्या गावात एका वर्षभरातून पन्नास ते साठ विवाह पार पडत अतील आणि एका लग्नात वीस ते पंचवीस किलो धान्य वापरले तर,साधारण चौदा ते पंधरा क्विंटल धान्य जमिनीवर पायदळी तुडवल्या जाते कि जे आपण पूर्णब्रम्ह समजतो,तेवढ्या धान्यामध्ये एखाद्या छोट्या गरीब कुटुंबातील एक दोन वर्षाच्या धान्याची गरज भागवता येईल.

गावातील सर्व समाजातील प्रतिष्ठित मंडळी, सुशिक्षित तरुण मंडळींनी एकत्र येऊन यासंदर्भात बैठका घ्यायला हव्यात.चर्चा करायला हव्यात. अनिष्ट प्रथा मोडायला हव्यात. त्याचबरोबर काही पश्चिमात्य अनुकरण जसे की, प्री-वेडिंग अफ्टर वेडिंग यासारख्या विकृतींवर आळा घालायला हवा. आपापल्या गावातून बदल करायला हवा. असे आटोपशीर व कमी खर्चात लग्न करणाऱ्याचा सत्कार करायला हवा.त्यातून इतरांना प्रेरणा मिळेल.मोठी लग्न केवळ मोठा दिखावा आहे. वरील सर्व गोष्टींचा सर्व समाजाने, युवा पिढीने या संदर्भात अत्यंत गांभीर्याने विचार मंथन करण्याची गरज आहे. चार लोक काय म्हणतील? तेच चार लोक चार दिवस नाव ठेवतील,तर ठेवू द्यात.होळीची बोंब दोन दिवस जेव्हा या सर्व गोष्टींचे समाजात सकारात्मक परिणाम दिसून येतील व समाजाचा सर्वांगिण विकास होण्यास मदत होईल व चहुकडे कौतुक होईल.

वरील सर्व मुद्दे सगळ्यांनाच मान्य असतील असे नाही म्हणून, पटलं तर घ्या,नाहीतर सोडून द्या.....!

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा ठाणे २०२५ चे आयोजन

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२२, ठाणे :** ठाणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा २०२५ चे आयोजन दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ ते ०१ मार्च २०२५ करण्यात आले आहे. सदर स्पर्धेमध्ये हॉकी, फुटबॉल, बास्केटबॉल, कुस्ती, बॉक्सिंग, रेसिंग इत्यादी १८ विविध क्रीडा प्रकारांचा समावेश असून त्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र पोलीस विभागातील ३४०६ खेळाडू भाग घेणार आहेत. हे स्पर्धा साकेत पोलीस परेड ग्राउंड, मुख्यालय येथील जुने परेड ग्राऊंड, साकेत तेथील हेली पॅड, सिद्धी हॉल इत्यादी ठिकाणी आयोजित करण्यात आलेले आहे. सदर स्पर्धेचे उद्घाटन दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व ठाणे जिल्हयाचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाची सांगता ही दिनांक ०१ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. सदर कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या प्रमुख पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला तसेच इतर मान्यवर हजर राहणार आहेत.

## मुंबईत विविध अभियांत्रिकी कामांसाठी तिन्ही मार्गावर आज मेगाब्लॉक

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२२, मुंबई :** मुंबईतील उपनगरीय प्रवाशांसाठी महत्वाची बातमी. मध्य, पश्चिम आणि हार्बर मार्गावर विविध अभियांत्रिकी आणि देखभालीच्या कामांसाठी आज रविवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी मेगाब्लॉक असणार आहे. त्यामुळे ठाणे कल्याण स्थानकांसह सांताक्रूझ, गोरेगाव स्थानकांवर अनेक लोकल गाड्या रद्द किंवा वळवण्यात आल्या आहेत. या ब्लॉकचा मुंबईसह लांब पल्ल्याच्या गाड्यांवर परिणाम होणार असून मुंबईकरांना वेळापत्रक पाहूनच घरातून बाहेर पडण्याचा सल्ला देण्यात आलाय. रुळांची दुरुस्ती, सिग्नल यंत्रणेची तपासणी अशा तांत्रिक दुरुस्त्यांसाठी हा ब्लॉकमध्य रेल्वेवर ठाणे ते कल्याण स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन जलद मार्गावर हा ब्लॉक सकाळी १०.४० ते दुपारी ३.४० या वेळेत असेल. ब्लॉक दरम्यान सीएसएमटीहून सुटणाऱ्या डाऊन जलद आणि अर्ध जलद लोकल गाड्या ठाणे ते कल्याणदरम्यान धीम्या मार्गावर वळवण्यात येणार आहेत, त्यामुळे त्या कळवा, मुंब्रा आणि दिवा स्थानकांवर थांबतील. याचप्रमाणे, कल्याणहून सुटणाऱ्या अप जलद आणि अर्ध जलद लोकल गाड्या कल्याण ते ठाणे दरम्यान धीम्या मार्गावर धावतील आणि नंतर मुलुंड स्थानकापासून पुन्हा जलद मार्गावर येतील.दरम्यान ट्रान्सहार्बर मार्गावर ठाणे ते वाशी/नेरूळ स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन मार्गावर सकाळी १२.१० ते दुपारी ४.१० या वेळेत ब्लॉक असणार आहे. या कालावधीत पनवेल, वाशी आणि नेरूळ येथून ठाण्याकडे जाणाऱ्या ट्रान्सहार्बर मार्गावरील सर्व लोकल सेवा रद्द करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे, ठाणेहून पनवेल, वाशी आणि नेरूळला जाणाऱ्या लोकल गाड्या ही बंद राहतील. पश्चिम रेल्वेवर सांताक्रूझ ते गोरेगाव स्थानकांदरम्यान जलद मार्गावर मेगाब्लॉक असणार आहे. हा ब्लॉक सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत घेतला जाणार आहे. या कालावधीत या मार्गावरील सर्व जलद लोकल गाड्या धीम्या मार्गावरून धावतील. त्याशिवाय, काही अप आणि डाऊन लोकल सेवा रद्द करण्यात येणार आहेत. याचदरम्यान बोरिवली आणि अंधेरी स्थानकांदरम्यान धावणाऱ्या काही लोकल गाड्या गोरेगावपर्यंतच चालवल्या जातील.

## नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आधारित ५ दिवसीय शिक्षकांचे प्रशिक्षण संपन्न

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.२२, हदगाव (नांदेड) :** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषद पुणे आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नांदेड तसेच गटसाधन केंद्र हदगाव यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण नवीन शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संकल्पना स्पष्टीकरण करण्यासाठी वर्ग पहिली ते बारावी पर्यंतच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळा वगळून सर्व माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनांच्या शिक्षकांचे ५ दिवसीय प्रशिक्षणाचा दुसऱ्या टप्पा औद्योगिक प्रशिक्षण संस्था हदगाव येथे उत्साहात संपन्न झाला. यात नवीन शैक्षणिक धोरण, उद्दिष्टे व शिक्षणातील बदललेल्या स्तरनिहाय आकृतीबंध,शाळा समृद्धी, शाळासिद्धि, राज्य अभ्यासक्रम आराखडा, पायाभूतस्तर, क्षमतावर आधारित अध्ययन, अध्यापन प्रक्रिया, क्षमता आधारित मूल्यमापन, प्रश्ननिर्मिती कौशल्य, समग्र प्रगतीपत्र, शाळा गुणवत्ता मूल्यांकन या विषयावर प्रशिक्षणात मांडणी करण्यात आली. व्याख्यानात चर्चा, गटकार्य सादरीकरण असे शिक्षणाचे स्वरूप होते. यात प्रामुख्याने नवीन शैक्षणिक धोरणामुळे अनेक मोठे बदल सुचवले आहेत. अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, अध्यापन, मूल्यमापन परीक्षा, भाषण निवड, व्यवसाय शिक्षण यात बदल होणार आहेत. एकूण २२ सुलभांच्या माध्यमातून प्रशिक्षणात दुसऱ्या टप्पासाठी २५० च्या वर शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. याचे उत्कृष्ट नियोजन गटशिक्षणाधिकारी किशनराव फोले, शिक्षण विस्तार अधिकारी एस.एन. बाच्छे यांच्या मार्गदर्शनाखाली अरविंद सूर्यवंशी, संदेश चौंडेकर, शिंदे गोदरे, चंद्रकांत मेकाले, जीवने, उदय देवकांबळे कावळे सह आदींनी केले. प्रशिक्षणात चहा व जेवणाची उत्तम व्यवस्था त्रिभुवन चव्हाण यांच्या माध्यमातून करण्यात आली होती.

## सागरी किनारा स्वच्छता मोहीमेसह प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवाई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२२, नवी मुंबई :** शहर स्वच्छतेमध्ये नवी मुंबईकर नागरिकांचा नेहमीच सक्रिय सहभाग राहिला असून लोकसहभागातून स्वच्छताविषयक विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. या अनुषंगाने नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली बेलापूर विभाग कार्यालयाच्या वतीने शिवजयंतीचे औचित्य साधून करावे येथील डोलाया समुद्रेश्वर सागरी किनारा परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये परिमंडळ उपआयुक्त सोमनाथ पोटरे आणि घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली, बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ.अमोल पालवे व स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर तसेच स्वच्छता निरीक्षक विजय नाईक यांच्यासह विभागातील अधिकारी, कर्मचारी व स्वच्छतामित्र यांनी सहभाग घेतला. यामध्ये विशेषत्वाने नमिता फिटनेस हब संस्थेच्या महिला पदाधिकारी व प्रतिनिधींनी उत्साही सहभाग घेतला. सर्वांनी मिळून खाडीकिनारा स्वच्छ करीत स्वच्छतेची सामुहिक शपथ ग्रहण केली. त्याचप्रमाणे परिमंडळ २ मधील प्लास्टिक विरोधी भरारी पथकाने सेक्टर १, घणसोली येथील दुकाने यांची तपासणी केली असता रेखा स्वीट्स या दुकानात प्लास्टिक पिशव्या व एकल वापर प्लास्टिक आढळल्याने त्यांच्याकडून ५ हजार रक्कमेचा दंड वसूल करण्यात आला तसेच १ किलोपेक्षा अधिक वजनाचे एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले. तसेच कोपरखैरणे येथील विनायक स्वीट मार्ट आणि बालाजी सुपर मार्केट यांच्याकडून प्रतिबंधित प्लास्टिक वापरल्याबद्दल प्रत्येकी ५ हजार असा एकूण १० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

## टाकळीढोकेश्वर यात्रा उत्सव कमिटीच्या पदांची नियुक्ती

### अध्यक्षपदी शिवाजी खिलारी तर उपाध्यक्षपदी किरण तराळ

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळीढोकेश्वर पंचक्रोशीतील सर्वधर्मियांचे श्रध्दास्थान असलेले जागृत देवस्थान ग्रामदैवत माता बनाई देवी यात्रा उत्सव कमिटीची बैठक गावच्या वेशी समोरील पारावरती नुकतीच खेळीमेळीच्या वातावरण पार पडली.

यावर्षीच्या यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी शिवाजी खिलारी तर उपाध्यक्षपदी किरण उर्फ रामभाऊ तराळ याची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. टाकळी ढोकेश्वर येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बनाई देवी यात्रा गुढीपाडव्याच्या तिसऱ्या दिवशी दि.०१ ते ०४ एप्रिल २०२५ रोजी या कालावधीत होणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक, धार्मिक उपक्रमांसाठी नियोजन बैठकीमध्ये यात्रा कमिटीची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. ती पुढीलप्रमाणे अध्यक्ष शिवाजी खिलारी, उपाध्यक्ष किरण उर्फ रामभाऊ तराळ, खजिनदार नारायण झावरे, गंगाधर बांडे, सह खजिनदार बाळासाहेब खिलारी, सचिव पत्रकार वसंत रांधवण तर सल्लागार म्हणून बाळासाहेब खिलारी, अशोकशेठ कटारिया, युवा उद्योजक राजुशेठ भंडारी, महेश पाटील, बबन हरिभाऊ बांडे तर प्रसिद्धी प्रमुखपदी पत्रकार वसंत रांधवण, सदस्यपदी बबन हरिभाऊ बांडे,शरद झावरे, विलास नाईकवाडी, गोरक्ष निवडूंगे, सुभाष जाधव, सोमनाथ



बांडे, महेश पाटील, शिराज हवलदार, बाळकृष्ण पायमोडे, अंकुश पायमोडे, किसन धुमाळ, धोंडीभाऊ झावरे, लक्ष्मण झावरे, विक्रम झावरे यांचा समावेश आहे. यांच्यासह गावातील जेष्ठ नागरिक व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. या चार दिवसीय होणाऱ्या यात्रेत विविध धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक मनोरंजनाचे, बैलगाडा शर्यतींचा कार्यक्रम आयोजित केला आहे. याप्रसंगी यात्रा कमिटीचे मार्गदर्शक निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांनी होणाऱ्या यात्रेची रूपरेषा सांगितली.

## पंचायत समिती महाबळेश्वर यांच्या माध्यमातून दोन दिवसीय शिक्षण महोत्सवाचे आयोजन

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२२, महाबळेश्वर (सातारा) :** शिक्षण विभाग, पंचायत समिती महाबळेश्वर यांच्या वतीने सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी व मंगळवार, दिनांक २५

फेब्रुवारी २०२५ रोजी तालुकास्तरीय शिक्षण महोत्सवाचे आयोजन पंचायत समिती महाबळेश्वरच्या प्रांगणात करण्यात आले आहे. विविध शैक्षणिक कार्यक्रमांची मेजवानी असलेल्या या नाविन्यपूर्ण महोत्सवाचे हे चौथे वर्ष आहे.

दुर्गम अशा महाबळेश्वर तालुक्यातील विविध माध्यमांच्या शाळांमध्ये समन्वय साधून शिक्षणाची प्रक्रिया गतिमान करणे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या कलागुणांना तालुकास्तरावर मोठे व्यासपीठ मिळवून देणे.स्थानिक स्वराज्य संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे. विविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थी व शिक्षक यांचा यथोचित गौरव करणे. शाळांच्या विकासामध्ये समाजाचा उत्तम सहभाग मिळवणे. विद्यार्थी, शिक्षक, पालक व समाज यांच्यामध्ये शिक्षण विषयक जनजागृती करून शैक्षणिक चळवळ उभी करणे, अशा विविध उद्दिष्टाना समोर ठेवून दरवर्षी या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असते.

दोन दिवसीय शिक्षण महोत्सवात दर्जेदार शैक्षणिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी ग्रंथदिंडी व शैक्षणिक चित्ररथाच्या माध्यमातून शिक्षण महोत्सवाची सुरुवात होईल. पंचायत समिती, बाजारपेठ, पोलीस स्टेशन, छ.शिवाजी महाराज चौक, अहिल्यादेवी चौक, पंचायत समिती या मार्गाने ग्रंथदिंडी संपन्न होईल. सकाळी ११ वाजता महोत्सवाचे उद्घाटन, आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण व यशोगाथा प्रकाशन सोहळा महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री नामदार मकरंद आबा पाटील, खासदार नितीनकाका पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, शिक्षण उपसंचालक महेश चोथे, शिक्षणाधिकारी प्राथमिक शबनम मुजावर, गटविकास अधिकारी यशवंत भांड यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

विद्यार्थ्यांच्या वाङ्मय निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी दुपारच्या सत्रामध्ये बाल साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. यात तालुक्यातील विद्यार्थी आपल्या स्वनिर्मित साहित्य कृती सादर करणार आहेत. लेखक जगन्नाथ शिंदे यांच्या हस्ते बालसाहित्य संमेलनाचे उद्घाटन होणार असून अध्यक्ष भरत सुरसे, प्रमुख अतिथी म्हणून प्रल्हाद पारठे व सुनील शेडगे उपस्थित राहणार आहेत. दुपारी ३ वाजता शिक्षक कवी संमेलन संपन्न होणार आहे. दंगलकार नितीन चंदनशिवे यांच्या हस्ते उद्घाटन तर अध्यक्ष म्हणून योगिता राजकर व प्रमुख अतिथी लक्ष्मीकांत रांजणे, तुकाराम धांडे, ज. तु. गार्डे असणार आहेत. संध्याकाळी ५ वाजता महाबळेश्वर तालुक्यातील शिक्षक व पंचायत समिती कर्मचारी यांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी मंगळवार, दिनांक २५ फेब्रुवारी रोजी सकाळच्या सत्रात प्रसिद्ध व्याख्याते संजय कळमकर यांचे 'शिक्षकांचे व्यक्तिमत्व घडवताना' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमास डाएट फलटणचे प्राचार्य डॉ.अमोल डोंबाळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. ११ वाजता शैक्षणिक परिसंवाद व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी नामदेव माळी. सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी प्रतिभा भराडे, माणिक वांगीकर, विज्ञान अभ्यासक वसंत जोशी परिसंवादात सहभागी होणार असून या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिक्षणाधिकारी (योजना) अनिस नायकवडी असणार आहेत. महाबळेश्वर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचा विविध कला गुणदर्शन कार्यक्रम दुपारी १२ वाजता आयोजित केला असून या कार्यक्रमाचे उद्घाटन सुप्रसिद्ध अभिनेत्री मृण्मयी देशपांडे यांच्या हस्ते होईल.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास सिद, प्रांताधिकारी राजेंद्र कचरे, तहसीलदार तेजस्विनी पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. दुपारी ३ वाजता शिक्षण महोत्सवाचा समारोप समारंभ व बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न होणार आहे. विविध स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी, दानशूर व्यक्ती व संस्था यांना सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास खासदार श्रीकांत शिंदे, शिक्षण संचालक योजना महेश पालकर, जिल्हा बँक संचालक राजेंद्रशेठ राजपुरे, सातारा जिल्हा मजूर फेडरेशन अध्यक्ष संजय गायकवाड, जिल्हा नियोजन समिती सदस्य, प्रविण भिलारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले, अर्चना वाघमळे, शिक्षणाधिकारी प्रभावती कोळेकर, महाबळेश्वर नगरपालिका मुख्याधिकारी योगेश पाटील, पाचगणी नगरपालिका मुख्याधिकारी निखिल जाधव यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

दोन दिवसीय शिक्षण महोत्सवास तालुक्यातील सर्व विद्यार्थी, शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन समिती, अधिकारी, पदाधिकारी, सरपंच यांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहून शैक्षणिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. असे आवाहन महोत्सव कार्यकारी समिती तसेच गटविकास अधिकारी यशवंत भांड आणि गटशिक्षणाधिकारी आनंद पळसे यांनी केले आहे.

## सुखेड जिल्हा परिषद शाळेत बालबाजार व रांगोळी प्रदर्शन



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२१, खंडाळा (सातारा) :** विद्यार्थांना व्यवहार ज्ञानाची ओळख होऊन त्यांच्या बुद्धिमत्ता वाढीच्या दृष्टीने सुखेड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शनिवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ रोजी बालबाजाराचे व रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळेतील विद्यार्थांना आपल्या शेतातील भाजीपाला, फळे, कडधान्यासह विविध खाद्य पदार्थ देखील विक्रीसाठी आणले होते. तसेच यावेळी विद्यार्थ्यांनी काढलेल्या रांगोळीतून धूम्रपान करने आरोग्यासाठी घातक असून सर्वांनी त्यापासून लांब राहावे असा संदेश दिला.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुखेडचे मुख्याध्यापक बाळासाहेब सोळस्कर, सहशिक्षक, शिक्षिका, अंगणवाडी सेविका, सरपंच रविंद्र धायगुडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संजय धायगुडे, माजी अध्यक्ष अंकुश धायगुडे सह सुखेड ग्रामस्थ बालक पालक आदींच्या उपस्थितीत या बालबाजाराचे उदघाटन करण्यात आले. या बालबाजारात शाळेतील विध्यार्थ्यांनी विविध पालेभाज्या,फळे, कडधान्य, विविध खाद्यपदार्थ आदी विक्रीसाठी आणले होते. शिक्षक, गावातील ग्रामस्थ, पालक आदींनी या विद्यार्थ्याकडून विविध फळबाज्या, फळे, खाद्यपदार्थ यावेळी खरेदी करून विध्यार्थ्यांचा उत्साह वाढवत मुलांमधील व्यवहार ज्ञान तपासून पाहिले. या बालबाजारात विद्यार्थी देखील खूप उत्सहाने खरेदी विक्री करताना दिसत होते.

## प्रधानमंत्री किसान योजना हप्त्याचे २४ फेब्रुवारी रोजी वितरण

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२२, ठाणे :** पी.एम. किसान योजनेंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दि.२४ फेब्रुवारी २०२५ रोजी दु.२ ते ३ या वेळेत १९ व्या हफ्त्याचे वितरण करण्यात येणार आहे. बिहार राज्यातील भागलपूर येथे किसान सन्मान समारोह या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. या ऑनलाईन समारंभामध्ये सर्व खासदार व आमदार उपस्थित राहणार आहेत. प्रगतीशील शेतकरी, कृषी विज्ञान केंद्र व कृषी विभाग यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या कार्यक्रमात सहभागी करून घेण्यात येणार आहे. मंत्री (कृषी), महाराष्ट्र राज्य यांनी सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्री महोदयांनीही या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. तरी या कार्यक्रमात जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी देखील सहभागी व्हावे, असे आवाहन कोकण विभाग, ठाणे विभागीय कृषी सहसंचालक अंकुश माने यांनी केले आहे.

## उपराष्ट्रपती धनखड यांचे घृष्णेश्वराचे सपत्निक दर्शन



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, छ. संभाजीनगर :** भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज वेरूळ येथील घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरात दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. त्यांच्या समवेत उपराष्ट्रपतींच्या सुविद्य पत्नी डॉ.सुदेश धनखड, राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, खासदार डॉ.भागवत कराड होते. यावेळी मंदिर प्रशासनाने त्यांचे स्वागत केले. त्यानंतर उपराष्ट्रपती धनखड यांनी विश्ववारसा स्थळ असलेल्या वेरुळ येथील लेणी क्र. १६ कैलास लेणेची पाहणी केली. त्यांनी येथील वारसास्थळ आणि लेणींविषयी माहिती जाणून घेतली. या परिसरातील कलाकृती ह्या अदभूत असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

# वर्कर्स फेडरेशनची खापरखेडा येथे संघटनात्मक बैठक संपन्न



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२२, नागपूर :** खापरखेडा येथील वीज केंद्राच्या चमरी गेस्ट हाऊस येथे महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनची संघटनात्मक बैठक केंद्रीय उपाध्यक्ष कॉम्रेड एस.आर.खतीब यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. संघटनेचे झोन अध्यक्ष कॉम्रेड विवेक गुंडरुकवार यांनी प्रस्ताविकपर भाषणात मुख्य कार्यालय पातळीवरील प्रश्नांची यशस्वी मांडणी करीत असल्याचे सांगितले. शिवाय महानिर्मिती कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या कारखाना भत्ता सर्व वीज कामगारांना मिळायला पाहिजे अशी मागणी केली. याप्रसंगी कॉम्रेड जितेंद्र अहिरे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात मानव संसाधन व लेखा विभाग तसेच टेक्निकल कॅडर यांच्यासाठी कोणते भत्ते मागायला हवेत तसेच संघटनेने आजपर्यंत केलेल्या उपलब्धी बाबत माहिती दिली.

कॉम्रेड महेश कुसरामे यांनी खेळाडूंना टीए व डीए व हॉटेल चार्जेस मध्ये बदल करून वाढीव भत्ता देण्यात यावा अशी मागणी केली. कॉम्रेड सतीश दुधाने यांनी नॉन टेक्निकल कॅडर ला सिस्टम भत्ता देण्यात यावा, त्याचबरोबर ॲडमिन बिल्डिंगचे रिनोवेशन करण्यात यावे. अशी मागणी केली कॉम्रेड नगराळे यांनी अग्निशमन विभागातील वाहन नियंत्रक अग्नि-यंत्रचालक यांना कनिष्ठ अग्निशमन अधिकारी या पदावर खातेनिहाय पदोन्नती मध्ये ७५ टक्के सरळ सेवेत पदे राखीव ठेवण्यात यावी अशी मागणी केली.

अप्रेंटिस पदाधिकारी वैभव पालांदूरकर यांनी महानिर्मितीच्या जाहिरातीमध्ये डिझेल मेकॅनिक, टर्नर, पंप मेकॅनिक व कोपा हे ट्रेड सामील करण्यासाठी संघटनेने कशी मदत केली याची माहिती दिली. तसेच चंद्रपूर विभागातील झोन सचिव कॉम्रेड संदीप भोयर यांनी केमिस्टच्या जाहिरातीमधील त्रुटी सर्वांना समजून सांगितल्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात कॉम्रेड एस.आर.खतीब यांनी संघटनेच्या स्थापनेपासून आजपर्यंत संघटनेने केलेला संघर्ष व संघटनेने सभासदांच्या हिताचे घेतलेले निर्णय याविषयी सखोल मार्गदर्शन केले. तसेच भविष्यात वीज कंपनी वाचवण्यासाठी सर्वांनी एकजुटीने राहण्याचे आवाहन केले. यावेळी संघटनात्मक बैठकीला मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. संघटनात्मक बैठकीचे संचालन कॉम्रेड निखिल लुटे यांनी केले.

# यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांसमोर विविध समस्या

## शेती व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाची जोड हवी

**अक्षराज : राजू गागरे**

**दि.२१, झरी (यवतमाळ) :** यवतमाळ जिल्हा हा महाराष्ट्रातील विदर्भातील जिल्हा आहे. येथील शेतकर्यांचा मुख्य व्यवसाय कापूस उत्पादन करणे आहे. जिल्ह्यात पुसद आणि वणी ही प्रमुख शहरांपैकी दोन आहेत. जिल्ह्यात पहाडी किंवा समतल उंच व अणकुचीदार डोंगरांनी भरलेले भूभाग आहेत. शेती व्यवसायात पांढरे सोने पिकविणारा म्हणून जिल्ह्याची ओळख आहे. येथे अनेक ठिकाणी दर वर्षी नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागतो. येथील शेतकऱ्यांना विविध समस्यांना सामोरं जावं लागत आहे. जिल्ह्यात शेती व्यवसायातून कापूस, ज्वारी, गहू, सोयाबीन, तूर, मूग, चना, फल्ली, मक्का, उडीत, फळभाज्या सहीत अनेक प्रकारची पिके घेतली जातात. जिल्ह्यातील शेतकरी हा समाजातील एक महत्त्वाचा सदस्य असून, तो लोकांना अन्न देतो. शेतकरी हा ग्राम व्यवस्था आणि कृषी समाजरचनेचा कणा आहे. परंतु आजच्या घडीला शेतकरी वर्गाच्या अनेक समस्यांकडे जिल्ह्यातील संबंधित कृषी विभागाचे दुर्लक्ष होत आहे. दरवर्षी ऐन हंगामात पुरस्थीतीचा नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागतो. मागणी केल्यानंतरही वेळेत शासनाची मदत होत नाही. त्यामुळे शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या शेती संबंधित योजनांपासून अनेक शेतकरी वंचित आहे. त्यामुळे शेती पाणंद रस्ते, सिंचनाच्या समस्यांचा सामना करावा लागत आहे महागाई समस्यांसह प्रदुषण वाढीचा देखील शेती पिकांना फटका बसत आहे. त्यामुळे अनेक शेतकर्यांना पिकांच्या उत्पादनात घट येत आहे.

जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी बांधवांना जीवन आवश्यक वस्तू महागाईचा सामना करावा लागत आहे. त्यासोबतच शेती व्यवसाय करताना पाण्याची कमतरता, कृत्रिम खतांचा अभाव, पिकांच्या हंगामात कीटकांचा हल्ला, मालाच्या किमतींची अस्थिरता, तंत्रज्ञानाची कमतरता, पायाभूत सुविधांचा अभाव, बियाणे, खते आणि इतर शेतीविषयक साधनांच्या किमती वाढणे, नैसर्गिक आपत्ती, वाढीव निविष्ठा खर्च, वाढती लोकसंख्या, आशा समस्या आहे. संबंधित कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या अनेक समस्यांवर उपाय योजना करीत व शेतकऱ्यांना वित्तीय साहाय्यता करून त्यांना आर्थिक साहाय्य करता येईल. शेतीला चालना देण्यासाठी मोठा उद्योग म्हणून घोषित करून शासकीय मदतीद्वारा शेतकऱ्यांच्या समस्या व्यवस्थित सुटू शकतील. शासनाच्या वतीने शेतकरी हिताचे धोरण ठरवून त्याची पारदर्शक अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. सध्याचे शासनाचे चुकीचे धोरण म्हणजे शेतकऱ्यांचे मरण अशी अनेकांची समज आहे. शासनाच्या चुकीच्या काही धोरणामुळे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण जैसे थे सुरू आहे. शेवटच्या टोकाची भूमिका घेत शेतकरी आत्महत्या का करतोय यावर तातडीने उपाय आवश्यक आहे. शेतकरी वर्गाची व्यथा समजून घेण्याची नितांत गरज बनली आहे. शासनाच्या वतीने अनेक योजना राबविल्या जातात तर मग आत्महत्या कशामुळे? खरं तर शासनाच्या दुर्लक्षित पणाचा जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना फटका बसत आहे. येथील शेतकऱ्याने उदरनिर्वाहासाठी किंवा धंदा म्हणून स्वतःच्या शेतावर चालविलेला व्यवसाय अशी ढोबळमानाने शेतीची व्याख्या करता येईल. शेतीचे चार प्रकार आहे. चार प्रकारची शेती म्हणजे पशुपालन, स्थलांतरित शेती, निर्वाह शेती आणि गहन शेती यापैकी जिल्ह्यात अनेक ठिकाणी पशुधनाचा वापर करीत पारंपरिक शेती केली जाते. अल्प भूधारक शेतकरी संख्येने अधिक प्रमाणात आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग काही प्रमाणात शेतकरी करीत असल्याचे दिसून येते. परंतू अल्प भूधारक शेतकरी पारंपरिक शेती पद्धतीला अधिक महत्त्व दिले जाते. त्यांच्या आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी जोड धंदा म्हणून गाय म्हैस शेळ्या मेंढ्या पालन कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय केले जाते. अशा काही जोडधंद्यामुळे शेतकरी बांधवांना काही प्रमाणात मदत होते.. त्याचबरोबर जिल्ह्यात आदिवासी लोक बहुसंख्येने आहेत कोलाम, गोंड, परधान, आंध या आदिवासी समाजाचे लोकही राहतात. त्यांना शासनाच्या वतीने शेत जमीन पट्टे आहेत. पारंपरिक पद्धतीने शेती व्यवसाय करतात. जिल्ह्यात कापूस, ज्वारी, गहू, सोयाबीन, तूर, मूग अशा प्रकारची पिके घेतली जातात तर मोह, तेंदू, डिंक महत्त्वाचे गौण वनोपज आहे तसेच गयी म्हैस शेळी पालन दुग्ध व्यवसाय करतात.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना योग्य वेळी वाजवी भावात शेती विषयक संसाधने देणे आणि शेती पूरक गरजेचे उत्पादन रास्त भावात विकत घेण्यासाठी सवलतीच्या सुविधा आवश्यक आहे. शेती पिकांच्या उत्पादन वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी व चालना देण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे. कृषीवित्तच्या योग्य व्यवस्थेद्वारा सुट देत त्यांना लाभदायक योजना आखून शेतकऱ्यांना विकासाच्या उद्देशाने पर्याप्त विजपुरवठा करणे आवश्यक आहे. शेतकरी हिताचे धोरण ठरवून शासकीय मदतीच्या विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्याची गरज आहे.

# संविधान जागर अभियानातून स्वातंत्र्यासाठी दिलेल्या बलिदानाचे स्मरण - उपराष्ट्रपती धनखड




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, छ. संभाजीनगर :** स्वातंत्र्यासाठी दिलेल्या बलिदानाचे स्मरण संविधान जागर अभियानातून करावे. हा संविधान जागर तरुण पिढीमध्ये मूलभूत हक्क आणि कर्तव्याचे जाणीव करून देण्यासाठी महत्वपूर्ण ठरेल, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी सरस्वती भुवन या शिक्षण संस्थेत आज केले.

'जागर संविधान संविधानाचा' या कार्यक्रमाचे उद्घाटन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्याहस्ते करण्यात आले. उपराष्ट्रपती यांच्या पत्नी डॉ.सुदेश धनखड, राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाठ, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे, राज्यसभेचे खासदार डॉ.भागवत कराड, सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष दिनेश वकील, सचिव श्रीरंग देशपांडे यावेळी उपस्थित होते.

उपराष्ट्रपती म्हणाले, क्रांतीकारकांनी केलेल्या बलिदानाचे सार्थक देशाच्या स्वातंत्र्यात झाले. विविध क्षेत्रातील धुरीणांनी भारतीय संविधान निर्मितीचे महान कार्य केले. संवाद समन्वय, सामंजस्य, संभाषण यातून आपले प्रजासत्ताक निर्माण झाले. देशात शांततापूर्ण वातावरण राखण्यात राष्ट्रहित असून प्रजासत्ताक स्थापनेचा हाच मूळ उद्देश आहे. म्हणूनच प्रत्येक नागरिकांनी भारतीय संविधानाप्रति आदर ठेवून देशात मूलभूत हक्कांबरोबरच कर्तव्य पार पाडणे आवश्यक असल्याचे श्री. धनखड यांनी सांगितले. संविधानाने दिलेला मतदानाचा हक्क नागरिकांनी जागरूकपणे बजावला पाहिजे.

यातून लोकप्रतिनिधीची निवड होत असते. आपण भारतीय असल्याची ओळख लोकशाही राज्यव्यवस्था ही संविधानाने दिलेली देणगी असून प्रत्येक भारतीयांनी राष्ट्रहित प्रथम मानून कर्तव्य बजवावे. संविधान जागर अभियान राष्ट्रवादाला प्रज्वलित करणारे ठरेल असेही श्री.धनखड यांनी सांगितले. याप्रसंगी सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या आवारात उपराष्ट्रपती जगदीप धनखड, त्यांच्या पत्नी सुदेश धनखड, राज्यपाल सी.पी. राधाकृष्ण यांनी 'एक पेड मा के नाम' अंतर्गत वृक्षारोपण केले. प्रास्ताविक दिनेश वकील यांनी केले.

# प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत जिल्ह्यातील ५५ हजार २८६ लाभार्थ्यांचे घरकूल मंजूर




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, बुलडाणा :** प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत जिल्ह्यातील ५५ हजार २८६ लाभार्थ्यांना घरकूल मंजुरीचे पत्र वाटप आणि त्यापैकी २८ हजार ७७६ लाभार्थ्यांना घरकुलाचा पहिला हप्ता केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते ऑनलाईन वितरित करण्यात आला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत पुण्यातील बालेवाडी येथील श्री शिव छत्रपती संकुल येथे राज्यातील २० लाख लाभार्थ्यांना घरकूल मंजुरी पत्र वाटप आणि १० लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरणाचा 'गृहोत्सव' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आदी मान्यवर उपस्थित होते. तर जिल्ह्यातून मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, उपायुक्त श्री कवडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी.एम मोहन, प्रकल्प संचालक राजेश इंगळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य आशिष पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत संजय इंगळे यांच्यासह अधिकारी, तसेच पंचायत समिती स्तरावरून स्थानिक आमदार, गटविकास अधिकारी, तसेच सर्व ग्रामपंचायत स्तरावरुन सरपंच, लाभार्थी, नागरिक ऑनलाईनरित्या सहभागी झाले होते. यावेळी या थेट प्रक्षेपण कार्यक्रमात सहभागी झालेल्या घरकूल लाभार्थ्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

# थोडक्यात

## रस्ता सुरक्षा अभियान फलकांद्वरे जनजागृती करुन शिवछत्रपती महाराज जयंती साजरी



**अक्षराज : गणेश जाधव**

**दि.२१, नेरूळ (नवी मुंबई) :** साईकृपा गृहनिर्माण घणसोली से ०१ संस्थांच्या माध्यमातून सालाबादप्रमाणे यंदाही छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव जोरात साजरा करण्यात आली. यामध्ये सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौकातून ज्योत प्रज्वलित करुण आणण्याची प्रथा आहे. या वेळेस संस्थेचे रहिवासी मधुकर पाटील बंधुकडुन चौकात रस्ता सुरक्षा अभियान फलकांद्वरे जनजागृती करताना स्वतः उभे राहून अपघात मुक्त समाज हा संदेश देणारे फलक हातात धरुन गर्दीत उभे होते. याकरिता नवतरुण मुलांनी सहभाग घेतला. साईकृपा संस्था ही सामाजिक बांधिलकी म्हणून विविध प्रकारच्या सामाजिक कार्यक्रम यशस्वी करतात. यंदाही साईकृपा प्रिमीयम लिग नंतर दुपारी महिलांच्या बडमिंटन स्पर्धा घेण्यात आली. त्यानंतर लहान मुलांच्या वतीने महाराजांच्या गुणगान राजांचे नृत्य सादर केले. रात्री स्नेह भोजनाचा आस्वाद घेऊन छावा चित्रपट दाखवण्यात आला. याकरिता सोसायटीच्या रहिवाशांना कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. यात अध्यक्ष धनंजय पाटील सचिव लक्ष्मीपुत्र सोडगि, खजिनदार गणेश भिलारे, तरुण सभासद पवार, सर्जेराव दौंडकर, वैभव दौंडकर, ईरेश अंटद, संतोष दौंडकर, नीतीन पाटील, बंदिछोडे, प्रसाद तोडकर, सौरभ पाटील,सौरभ दौंडकर, हरि खैरे, विशाल खैरे, डफळ बंधु, विजय मोरे, भगत बंधु, शिवशंकर अंटद, कदम, योगेश तेलुणगि तसेच मधुकर पाटील व वरिष्ठांच्यां मार्गदर्शनाखाली सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करुन जंयती साजरी केली.

## क्रिडा स्पर्धेत यश संपादन केलेल्या विजेत्यांचा सत्कार




**अक्षराज : रजत डेकाटे**

**दि.२१, नागपूर :** नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत आयोजित जिल्हा परिषद कर्मचारी अधिकारी क्रीडा स्पर्धेत यश संपादन केलेल्या अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा गुणगौरव सोहळा आबासाहेब खेडकर सभागृह जिल्हा परिषद नागपूर येथे पार पडला. भिवापूर येथील महिला शिक्षिका संघाने व्हॉलीबॉल स्पर्धेत प्रतिस्पर्धी संघावर विजय मिळवत यश संपादित केले. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्या हस्ते पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन भिवापूर तालुक्यातील अनेक अधिकाऱ्यांना व महिला शिक्षिका संघाला गौरविण्यात आले.

प्रशिक्षक सुरज येल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली महिला संघाचे व कर्णधार मेघा गुरनुले यांच्या नेतृत्वात संघातील शिला रोडे, ऊषा पराते, कुंदा घोडमारे, संगीता बनसोडे, आरती देवगडे या महिला खेळाडूंचा समावेश होता. तसेच ४०० मीटर धावणे स्पर्धेत युवराज चव्हाण प्रथम तर प्रशांत अंबादे कॅरम स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. राजेश गोडे कनिष्ठ लेखाधिकारी यांनी ऐकलं नृत्य सादर केले होते. त्यात त्यांनी ऐकलं नृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला. राजेश खिची अधिक्षक शिक्षण विभाग यांनी गायनामध्ये प्रथम क्रमांक पटकवला. महिला शिक्षिका संघाच्या यशामागे प्रशिक्षक सुरज येल्ले यांनी अथक परिश्रम घेतले होते.या यशामुळे भिवापूर तालुक्यातील महिला शिक्षिका सघाने तालुक्यात दुसऱ्यांदा भिवापूर तालुक्याचा मान जिल्ह्यात उंचावला आहे.

## परिमंडळ ०३ विशेष पथकाची कारवाई - ७ ग्रॅम एमडीसह इसम अटकेत



**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.२२, कल्याण :** परिमंडळ ०३ च्या अमली पदार्थ विरोधी विशेष पथकाने केलेल्या कारवाईत बैलबाजार चौक परिसरातून एक इसम अंमली पदार्थांसह अटकेत घेतला आहे. माहितीनुसार, MFC पोलीस स्टेशनच्या हद्दीतील बैलबाजार चौकात विशेष पथकाने छापा टाकून माताफ अनिस रईस (वय ३३ वर्षे, रा. रूम नं. १०, जुना मच्छी मार्केट, गोल्डन प्लाझा बिल्डिंग, कल्याण पश्चिम) याला अटक केली. त्याच्या जवळ ७ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) हा अंमली पदार्थ विक्रीसाठी ठेवलेला आढळून आला. या प्रकरणी आरोपीवर NDPS Act च्या कलम ८(c) आणि २०(b) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास MFC पोलीस करत आहेत. अंमली पदार्थ विरोधी पथकाने केलेल्या या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहाव्यात. अशी मागणी केली जात आहे.

## जागरूक पालक बनण्यासाठी उद्देश्यपूर्ण चर्चा सत्र संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, मुंबई :** वांद्रे मुंबई येथील सेंट टेरेसा शाळा प्राथमिक विभागाच्या पालक शिक्षक संचाच्या वतीने नुकतेच २० आणि २१ फेब्रुवारी २०२५ रोजी शाळेच्या हॉलमध्ये इयत्ता पहिली ते चौथीच्या पालकांसाठी उद्देशपूर्ण जबाबदार पालकत्व या विषयावर चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सेंट पॉल समुपदेशन केंद्र नवजीवन च्या संचालिका सिस्टर स्टीव्हना लोबो यांनी पालकांना संबोधित केले. पी टी ए च्या उपाध्यक्ष सविता निर्मल यांनी सिस्टरा लोबो यांचे स्वागत केले तर शाळेचे मुख्याध्यापक फादर निकी यांनी प्रमुख वक्त्या लोबो यांची ओळख करून दिली. या चर्चा सत्राचा उद्देश पालकांना त्यांच्या मुलांचा भावनिक, सामाजिक आणि बौद्धिक विकासाला चालना देणाऱ्या प्रभावी पालकत्व धोरणांसह सुसज्ज करणे हा होता. सिस्टर लोबो यांनी आजच्या धावपळीच्या जगात जागरूक पालकांचे महत्व यावर भर देऊन मुलांच्या विकासावर भर देणारे मुद्दे, मुलांबरोबर खुल्या संवादाची आवश्यकता, सकारात्मक बळकटी देणे, सुसंकृत व्यक्तींना वाढविण्यासाठी निरोगी सीमा निश्चित करण्याची गरज असल्याचे सांगितले.मुलांच्या विकास त्यांची बुद्धिमत्ता, वास्तविक जीवनातील उदाहरणे आणि पालकांशी परस्पर चर्चा करून त्यांनी आपण आदर्श पालक कसे बनू शकतो यावर जोर दिला.मुलांना प्रेम, संवाद आणि समजूतदारपणे आपण कसे वागवू शकतो हे सांगितले. पालक शिक्षक संघाच्या सचिव शिक्षिका मीनल कुटिन्हो यांनी सिस्टर लोबो आणि उपस्थित पालकांचे आभार मानले.